ePaper

## शेतकऱ्यांवर अन्याय का?; उद्योजकांच्या कर्जमाफीवरून राहुल गांधी यांचा सवाल



वर्ष - 6 । अंक - 216 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- पुण्यात भाजप आणि काँग्रेस आमने – सामने
- पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या इमारतीचा अखेर ‘निकाल लागला’!
- थकबाकी आणि सामान्य ग्राहक


www.mahaenews.com | ।शनिवार ।दिनांक19नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## ‘महाईन्यूज’ च्या वृत्ताची महापालिका प्रशासनाकडून दखल!

# ‘ऑन दी स्पॉट’ फैसला!

### अवघ्या 4 तासांत स्माशनभूमी चकाचक : अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांचा कर्तव्यदक्षपणा





।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निगडी अमरधाम स्मशानभूमीतील शौचालयाची दुरावस्था आणि अस्वच्छता निदर्शनास आल्यानंतर अवघ्या ४ तासांत स्मशानभूमी चकाचक करण्यात आली. यासह या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांसाठी फिरते शौचालयही कार्यान्वयीत करण्यात आले. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.**


दिव्या खाली अंधार!

“महाईन्यूज” ने प्रसिद्ध केलेल्या वृत्ताची दखल घेत महापालिका अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी ‘ऑन दी स्पॉट फैसला’ केला आणि यंत्रणा कामाला लावली. जगताप यांच्या कर्तव्यदक्षपणामुळे प्रशासनात कर्तव्याप्रति ‘डोळेझाक’ करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत अंजन पडले आहे.

संबंधित स्मशानभूमितील सदर शौचालय तब्बल दोन वर्षांपासून बंद आहे. प्रशासनाच्या वतीने नवीन शौचालय बांधण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली होती. परंतू, या कामास पाच महिन्यांचा कालावधी उलटून देखील महापालिकेने नेमलेल्या ठेकेदाराकडून अद्यापही काम पूर्ण केले नाही. अत्यंत संथ गतीने चाललेल्या शौचालयाच्या बांधकामामुळे तेथे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या तक्रारीची दखल घेऊन शौचालयाचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिपक खैरनार यांनी केली होती. याबाबत शुक्रवारी सकाळी वृत्त प्रसिद्ध करण्यात आले.

दरम्यान, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी फ-क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आरोग्य अधिकारी माने यांना धारेवर धरले.



यंत्रणा कामाला लागली आणि स्मशानभूमीच्या स्वच्छतेचे काम पूर्णही करण्यात आले. यासह या ठिकाणी अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांकरिता फिरते शौचालय तात्काळ कार्यान्वयीत करण्यात आले. तसेच नियमित साफसफाई करण्याचे आदेश दिले आहेत.

> “पिंपरी-चिंचवडमधील सर्वसामान्य नागरिकांना पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे पुरवण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. नागरिकांनी काही तक्रारी असल्यास तात्काळ ‘सारथी’ हेल्पलाईनला संपर्क करावा. नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी प्रशासन प्राधान्याने पुढाकार घेत आहे. स्वच्छतेबाबत कोणताही हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घेतली जात आहे.
> – **उल्हास जगताप**, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# पुण्यात भाजप आणि काँग्रेस आमने–सामने

## काँग्रेस भवनातील राहुल गांधींच्या छायाचित्राला भाजपने काळे फासले

**पुणे । महाईन्यूज ।**

**'भारत जोडो' यात्रे दरम्यान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविरोधात केलेल्या वादग्रस्त विधानानंतर भाजप आणि काँग्रेस आमने – सामने आले आहेत. भाजपने काँग्रेस भवनात जाऊन 'माफीवीर जवाहरलाल नेहरू' असे फलक लावत; तसेच राहुल गांधी यांच्या छायाचित्राला काळे फासले. युवक काँग्रेसने सारसबाग येथील सावरकरांच्या पुतळा परिसरात 'माफीवीर' असे फलक लावले दरम्यान, सारसबाग येथील सावरकरांच्या पुतळ्याला भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून दुग्धाभिषेक करण्यात आला.**



याप्रकरणी भाजप आणि काँग्रेसकडून परस्पर विरोधी तक्रार अर्ज पोलिसांकडे देण्यात आले आहेत. भारत जोडो यात्रे दरम्यान राहुल गांधी यांनी सावरकर यांच्याविरोधात वादग्रस्त विधान केले होते. त्याविरोधात भाजपकडून आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. कर्वे रस्त्यावरील सावरकर स्मारक परिसरात काँग्रेसविरोधात भाजप पदाधिकाऱ्यांकडून आंदोलन करण्यात आले. सारसबाग येथीलसावरकर यांच्या पुतळा परिसरात काँग्रेस कार्यकर्त्यांकडून आक्षेपार्ह मजकूर लावण्यात आल्याचे समजल्यानंतर भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस भवनाकडे मोर्चा वळविला. काँग्रेस भवन येथे घुसून कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत भिंतींवर 'माफीवीर जवाहरलाल नेहरू' अशा मजकूर असलेले फलक लावले. काँग्रेस भवनातील राहुल गांधी यांच्या छायाचित्राला काळे फासून निषेध नोंदविला. सारसबाग येथील सावरकरांच्या पुतळा परिसरात युवक काँग्रेसचे सरचिटणीस रोहन सुरवसे पाटील यांनी 'माफीवीर' असे फलक लावल्याने शहरातील भाजपने आक्रमक भूमिका घेतली. सावरकरांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक केला. भाजप शहराध्यक्ष जगदीश मुळीक आणि माजी नगरसेवक धीरज घाटे यांनी सारसबाग येथील सावरकर पुतळा परिसरात आक्षेपार्ह मजकूर प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिला आहे.राहुल गांधी यांनी केलेले विधान निषेधार्थ आहे. तसेच आम्ही ठिकठिकाणी आंदोलन करून राहुल गांधींचा निषेध करणार असल्याचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी सांगितले.

लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आंदोलन करण्याचा आणि मत मांडण्याचा अधिकार आहे. मात्र, काँग्रेस भवन येथे भाजपच्या कार्यकर्त्यांनी केलेले आंदोलन भ्याड पद्धतीचे आहे. आम्ही त्या घटनेचा निषेध व्यक्त करतो. संबंधितांविरूद्ध पोलिसांकडे तक्रार करणार आहे, अशी माहिती काँग्रेसचे सचिन आडेकर यांनी दिली.

## जलजीवन मिशनअंतर्गत अस्तित्वातील योजनांची क्षमता वाढवा

**पुणे । महाईन्यूज ।**

जलजीवन मिशन योजना सध्या ज्या गावात अस्तित्वात आहे मात्र निकषानुसार पुरेसा पाणीपुरवठा होत नाही, तेथे नवीन योजना करण्याऐवजी सध्याच्या अस्तित्वातील योजनांची क्षमता वाढ करण्यावर भर देण्यात यावा, अशी सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री, राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना गुरुवारी केली. जिल्ह्यात सुरू



असलेल्या जलजीवन योजनांच्या कामांचा आढावा चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी घेतला. जलजीवन मिशनची कामे गतीने आणि पारदर्शीपणे पूर्ण करावीत, अशी सूचनाही चंद्रकांत पाटील यांनी केली. आमदार भीमराव तापकीर, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक शालिनी कडू, पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रकाश खताळ, उप कार्यकारी अभियंता अमित आडे या वेळी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांनी सादरीकरण करून योजनेच्या प्रगतीची माहिती दिली.


सन २०२४ पर्यंत जिल्ह्यातील ग्रामीण भागात प्रत्येक घरी नळाचे

## कोरेगाव पार्क परिसरात बेकायदा हुक्का पार्लरवर कारवाई

### हुक्का पार्लर चालकासह तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल

**पुणे । महाईन्यूज ।**

कोरेगाव पार्क परिसरात हॉटेलमधील बेकायदा हुक्का पार्लरवर पोलिसांनी छापा टाकला. पोलिसांनी हुक्का पार्लर चालकासह तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. या कारवाईत हुक्का पात्र, सुगंधी तंबाखू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या प्रकरणी नरेंद्र अक्षयकुमार चौधरी (वय २०) शामल मनोरंजन देवनाथ (वय ३१), कुमार अमर



प्रधान (दोघे रा. रागविलास सोसायटी, नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मुंबईतील कमला मिल येथे झालेल्या दुर्घटनेनंतर राज्य सरकारने हुक्का पार्लरवर बंदी घातली आहे. कोरेगाव पार्कमधील डार्क हॉर्स हॉटेलमध्ये बेकायदा हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने डार्क हॉर्स हॉटेलमधील हुक्का पार्लर चालक नरेंद्र चौधरी याला ताब्यात घेऊन कारवाई केली.

कोरेगाव पार्क परिसरातील गल्ली क्रमांक सात येथे डेझर्ट वॉटर हॉटेलमध्ये हुक्का पार्लर सुरू असल्याची

# पुन्हा 'चक्काजाम'चा 'स्वाभिमानी'चा इशारा!

**पुणे। महाईन्यूज ।**

एकरकमी एफआरपीसह अन्य मागण्यांसाठी पुण्यात साखर आयुक्तालयावर मोर्चा काढला, त्याची कोणतीही दखल सरकारने घेतली नाही. शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक सुरूच आहे. त्यामुळे दोन दिवसांचे चक्काजाम आंदोलन केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. या नंतरही सरकारने ठोस निर्णय न घेतल्यास २५ नोव्हेंबरला पुन्हा चक्काजाम आंदोलन करू, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी दिला.

माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले, 'दोन दिवसांचे आंदोलन आज (शुक्रवारी) थांबवत आहोत. शेतकरी, ऊसतोडणी मजूर, वाहतूकदारांनी आम्हाला सहकार्य केले. कुठेही जबरदस्तीने ऊसतोडी किंवा ऊस वाहतूक बंद करावी लागली नाही. शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळतोय. पण, सरकार आमची दखल घेत नाही. सरकारने ठोस निर्णय न घेतल्यास पुन्हा २५ नोव्हेंबरला चक्काजाम आंदोलन करणार आहोत. एफआरपी काढण्याचे सूत्र निश्चित केले तेव्हा इथेनॉल निर्मिती होत नव्हती. त्यामुळे आता नव्याने उसासाठी

> **कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत आंदोलन शंभर टक्के यशस्वी झाले. महाविकास आघाडी सरकारने एफआरपीचे तुकडे पाडण्याचा कायदा केला होता. राज्याला असा अधिकार नाही. मागील सरकारचा हा कायदा रद्द करण्याचा निर्णय शिंदे-फडणवीस सरकार का घेत नाही? आमच्या कुठल्याही मागणीचा सरकारच्या तिजोरीवर परिणाम होणार नाही. तरीही शेतकरी हिताचे निर्णय का घेतले जात नाहीत?**

एफआरपी निश्चित करणारे सूत्र पुन्हा ठरवावे. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही, याची काळजी घ्यावी. नव्याने मिळणारी एफआरपी एकरकमी मिळावी, तिचे तुकडे पाडू नका. कारखान्यांवर काटामारी सुरूच आहे. त्यातून शेतकऱ्यांची दरवर्षी ४५०० हजार कोटींची लूट कारखाने करतात. वाहतूक खर्चात सतत वाढ दाखविली जाते. हे सर्व थांबविण्याची आमची मागणी आहे. या बाबत आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत,पण सरकार



ढिम्म आहे. काहीच निर्णय घेत नाही. सरकारने तत्काळ निर्णय घ्यावा, आम्हाला हिंसक आंदोलन करण्यास सरकारने भाग पाडू नये.'

# पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या इमारतीचा अखेर ‘निकाल लागला’!

## एकूण 105.77 कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता : आ. महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा



### मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्र्यांचे आभार : महेश लांडगे



मोशी येथे एकूण ९ मजले आणि २६ कोर्ट हॉल अशी पिंपरी-चिंचवड न्यायालयाची प्रशस्त इमारत उभारण्यात येणार आहे. त्यामध्ये रेन रुफ वॉटर हार्वेस्टिंग, प्रशस्त फर्निचर, अग्निशमन यंत्रणा, वाहनतळ, वातानुकुलित यंत्रणा, उद्वहन, सी.सी.टी.व्ही. सिस्टिम अशी अद्ययावत इमारत उभारण्याच्या कामाला आता गती मिळेल. शहरातील अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प कोविड महामारी आणि महाविकास आघाडी सरकारच्या काळात रखडले. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमध्ये शहरातील प्रकल्पांना गती मिळेल, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.

> बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲडव्होकेट्स गोवाचे अध्यक्ष ॲड. अतिश लांडगे म्हणाले की, गेल्या १० वर्षांपासून न्यायालयाच्या इमारतीचा प्रश्न प्रलंबित आहे. १ मार्च १९८९ साली पिंपरी-चिंचवड न्यायालयाची स्थापना झाली. मात्र, अद्याप इमारतीचा प्रश्न मार्गी लागला नाही. महाविकास आघाडी सरकारच्या काळात निधी अभावी इमारतीच्या उभारणीला खोडा बसला होता. त्या काळात आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून नेहरुनगर येथे पर्यायी जागेत न्यायालय स्थलांतरीत करण्यात आले. तेथील फर्निचरसाठीसुद्धा लांडगे यांनी ८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. आता राज्य सरकारमुळे इमारतीच्या कामाला गती मिळणार आहे. याचे समाधान वाटते. अंदाजपत्रकात तरतूद करुन जानेवारीमध्ये इमारतीचे भूमिपूजन व्हावे, अशी विनंती आम्ही मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे करणार आहोत.
> **- ॲड. अतिश लांडगे,** अध्यक्ष, महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशन.

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**गेल्या १० वर्षापासून निधी आणि राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे प्रलंबित असलेला पिंपरी-चिंचवड न्यायालय इमारत उभारणीचा प्रश्न अखेर सुटला आहे. राज्य सरकारकडून इमारतीच्या उभारणीसाठी तब्बल १०५.७७ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाली असून, पुढील कार्यवाही लवकरच सुरू करण्यात येणार आहे.**

मोशी येथे पिंपरी-चिंचवड शहरातील न्यायालयाची भव्य इमारत उभारण्याचे प्रस्तावित आहे. शहरातील लोकसंख्या २७ लाखांच्या घरात आहे. अनेक न्यायालयीन खटले प्रलंबित आहेत. मात्र, अद्याप पिंपरी-चिंचवड न्यायालयाला स्वत:ची इमारत नाही. त्यामुळे विधी क्षेत्रातून नाराजीचा सूर होता. दरम्यान, बार असोसिएशनच्या मागणीनुसार पिंपरी-चिंचवड न्यायालयाकरिता पर्यायी इमारत उलब्ध करुन देण्यात आली. त्या ठिकाणी कामकाज सुरू होते. मात्र, प्रस्तावित इमारतीच्या कामाला गती मिळत नव्हती. त्यामुळे आमदार लांडगे यांनी सरकारकडे पाठपुरावा सुरू केला होता.

राज्य सरकारने अखेर न्यायालयाच्या इमारतीसाठी सकारात्मक भूमिका घेतली. न्यायालयात एकूण ९ मजली होणार आहे.

त्यापैकी पहिल्या टप्प्यात एकूण ४ मजले आणि २६ कोर्ट हॉल अशी सर्व सुविधायुक्त इमारतीच्या उभारणीकरीता विधी व सामाजिक न्याय विभागाने एकूण १०५.७७ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली.

---

# नागरी आरोग्य संरक्षणासाठी “जिजाऊ क्लिनिक”

## आमदार महेश यांच्याहस्ते दोन ठिकाणी भूमिपूजन : आरोग्य सुविधांमध्ये शहराला आत्मनिर्भर करण्याचा संकल्प

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



> पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी शहराच्या विविध भागांमध्ये जिजाऊ क्लिनिक संकल्पना राबवण्यात येत आहे. त्याचे भूमिपुजन आज चऱ्होली आणि दिघी येथे पार पडले. आगामी काळात भोसरी विधानसभा मतदार संघातील विविध भागांमध्ये ३० ठिकाणी जिजाऊ क्लिनिक सुरू करण्याचा आमचा संकल्प आहे.
> **- महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पिंपरी-चिंचवड शहरातील आरोग्य सुविधा सक्षम करण्याची भूमिका महापालिका प्रशासनाच्या वतीने घेण्यात आली आहे. त्यासाठी शहरात ठिकठिकाणी “जिजाऊ क्लिनिक” उभारण्यात येत आहेत. त्यापैकी भूमिपूजन चऱ्होली आणि दिघी येथे करण्यात आले. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या पुढाकाराने चऱ्होली आणि दिघी येथे “जिजाऊ क्लिनिक” उभारण्याच्या कामाचा भूमिपूजन भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी चऱ्होलीतील भूमिपूजन समारंभास माजी महापौर नितीन काळजे, माजी नगरसेविका सुवर्णा बुर्डे, विकास बुर्डे, सचिन तापकीर, संतोष तापकीर, बाबा तापकीर, नंदू दाभाडे, श्रीकांत तापकीर आदी उपस्थित होते. तसेच, दिघीतील भूमिपूजन समारंभास माजी उपमहापौर हिरानानी घुले, दत्तात्रय गायकवाड, दत्तात्रय परांडे, संजय गायकवाड, सांगळे गुरूजी, उदय गायकवाड, आमसिद्ध भिसे, कुलदीप परांडे, रामदास कुंभार, लहू परांडे, प्रमोद पठारे, ॲड. संजय नागरगोजे, सह शहर अभियंता प्रमोद ओंबासे, कार्यकारी अभियंता शरीष पोरेड्डी, उपअभियंता सुनील पवार आदी उपस्थित होते. ख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून भोसरी मतदार संघातील ३० ठिकाणी “जिजाऊ क्लिनिक” सुरू करण्यात येतील.

---

# राहुल गांधींविरोधात भाजपाचे “जोडो मारो आंदोलन!

## संकेत चोंधे : "राहुल गांधींनी खोटा इतिहास सांगत हिंदूप्रेमींचा अवमान केला

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

> कॉंग्रेस नेते राहुल गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बद्दल अवमानकारक व खोटा बदनामीकारक इतिहास सांगून सावरकरांचा व हिंदु प्रेमीचा अवमान केला आहे. याचा आम्ही तीव्र शब्दांत निषेध करीत आहोत.
> **- संकेत चोंधे, शहराध्यक्ष, भाजयुमो.**




काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी दोन दिवसांपूर्वी वीर सावरकर यांच्यावर टीका केली होती. त्यावर राज्यात जोरदार प्रतिक्रिया उमटल्या. भाजप, मनसे व शिंदे गट राहुल गांधींच्याविरोधात आक्रमक झाले आहेत. भाजपच्यावतीने तर राज्यभर आंदोलनं करण्यात आलं. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहर भाजपा युवा मोर्चातर्फे आज शहरात राहुल गांधी यांच्या विरोधात "जोडे मारो आंदोलन" करण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बद्दल अवमानकारक व खोटा बदनामीकारक इतिहास सांगून सावरकरांचा व हिंदु प्रेमीचा अवमान केला आहे, असं वक्तव्य पिंपरी चिंचवड युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे यांनी केले आहे.

यावेळी भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस अनुप मोरे, प्रदेश सदस्य अजित कुलथे, पिंपरी चिंचवड युवा मोर्चा अध्यक्ष संकेत चोंधे, सरचिटणीस दिनेश यादव, तेजस्विनी कदम, दिपक नागरगोजे, उपाध्यक्ष प्रसाद कास्प्टे, राहुल खाडे, शिवराज लांडगे, सतिश नागरगोजे, प्रशांत बाराथे, पंकज शर्मा, जयदिप करपे, जयदेव ढोरे, चिटणीस प्रकाश चौधरी, मंगेश धाडगे, निलेश अष्टेकर, नम्रता माळी, सारिका माळी, मंडल अध्यक्ष सुमित घाटे, सनी बारणे, देविदास तांबे, शिरीष जेधे, विद्यार्थी संयोजक दिगंबर गुजर, सह संयोजक अनिकेत शेलार, सोशियल मिडीया संयोजक विक्रांत गंगावणे व ईतर पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, कॉंग्रेसची ' भारत जोडो यात्रा' सध्या महाराष्ट्रात असून ही यात्रा ७ सप्टेंबरला कन्याकुमारी येथून निघाली होती.

## संपादकीय »

# कितीही मारला तरी, गांधी काही मरत नसतो!

***7 सप्टेंबर रोजी दक्षिणेतील कन्याकुमारी येथून काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची भारत जोडो पदयात्रा सुरू झाली. 61 व्या दिवशी नांदेडच्या देगलूरमध्ये राहुल गांधींचे आणि भारत जोडो यात्रेचं दणक्यात स्वागत झालं.***

भारत जोडो यात्रेने हजारपेक्षा जास्त किलोमिटरचा टप्पा पूर्ण केला आहे. प्रत्येक दिवस अधिक मजबूत! भारताचा आवाज अजूनच बुलंद होत आहे. भारत जोडो यात्रा चार राज्यातून प्रवास करुन महाराष्ट्रात दाखल झालीये. लोकांचाही मोठा प्रतिसाद मिळतो आहे. राहुल गांधी यांना बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. भारत जोडो यात्रेनिमित्त राहुल गांधी इंदूरमध्ये येणार आहेत. परंतु राहुल गांधी इंदूरमध्ये दाखल होण्याआधीच त्यांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. इंदूरमधील एका मिठाईच्या दुकानात धमकीचे एक निनावी पत्र सापडले आहे. त्या पत्रातून राहुल गांधींना ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे.

खरं सांगायचे झाले तर ,तो किती थोर आहे, माहीत नाही. संशयच आज एवढा बलशाली आहे की, त्याच्यावरही भरवसा किती ठेवावा, हे अद्याप नीट कळत नाही! पण, ज्या दर्जाचा प्रतिसाद आज त्याला मिळतो आहे, जे प्रेम तो अनुभवतो आहे, लोक जे काही वेडे होताहेत, त्याने एक गोष्ट सिद्ध झालीय.'गांधी' काही मरत नाही. यात्रा 'दांडी' असेल वा आणखी काही. एक मात्र विसरून चालणार नाही. लोकांना नको असते दंगल, रक्त सांडणारी.

नको असतात भेसूर माणसं, खोटं बोलणारी.
त्यांना हवं असतं प्रेम, जे मनापासून असेल
नि हवं असतं गोड जग, जे आतून खुलेल!
असं मिळू लागतं, तेव्हा लोक झुगारतात
इंद्राचा ऐरावत!
अशी खात्री पटते, तेव्हा नाकारतात
खोटे मानमरातब!!
'त्यांच्या' सत्तेचा सूर्य मग मावळू लागतो
बलाढ्य खुर्चीचा माजही आक्रसू लागतो
साधी माणसं मग एकवटू लागतात
एका वेड्याच्या भवताली जमू लागतात!
मग तो कोणी पप्पू असो
वा अगदी बच्चा असो!
पण यार, तो जेव्हा सच्चा असतो ना,
तेव्हा तो उद्ध्वस्त करतो
तुमची अवघी सेना! तुमची अवघी सत्ता!
अशाच लहान चणीच्या गांधीनं
बलाढ्य इंग्रजांना हरवलं
एका फाटक्या माणसानं
महाशक्तीला नमवलं!
इतिहास थांबत नसतो.
पुन्हा प्रकटत असतो.
कितीही मारला तरी,
गांधी काही मरत नसतो!




# थकबाकी आणि सामान्य ग्राहक



अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याप्रमाणेच गेल्या काही दशकांत वीज ही माणसाची मूलभूत गरज बनली आहे. सर्वसामान्य वीजग्राहक वीजजोडणी, बिल भरणे यांबाबत अतिशय दक्ष असतो. त्यामुळे अव्वाच्या सव्वा बिल आले किंवा थोड्याश्या विलंबापोटी नोटिस आली, तर त्याच्या मनात सतत एकच विचार येतो, की 'माझ्या पाचशे-हजार रुपयांच्या लहानशा बिलासाठी एवढा त्रास का?'

सप्टेंबरच्या आकडेवारीनुसार महावितरणची थकबाकी सुमारे ७१ हजार कोटी रुपये आहे. वीज नियामक आयोगानुसार येत्या मार्चपर्यंत महावितरणची वार्षिक उलाढाल सुमारे ८७ हजार कोटी रुपये असेल. ही खासगी कंपनी असती, तर बँका किंवा इतर सरकारी खात्यांनी त्यांच्याविरुद्ध काय कारवाई केली असती, हा विचारच न केलेला बरा. पण ही सरकारच्या आधिपत्याखालील कंपनी असल्याने हे सर्व क्षम्य आहे. या थकबाकीची मुख्य फोड पुढीलप्रमाणे आहे. शेतीपंप रुपये ४६ हजार कोटी, पाणीपुरवठा सुमारे अडीच हजार कोटी, रस्त्यावरील दिवे सुमारे सहा हजार ६०० कोटी आणि कायमस्वरूपी वीज तोडलेले सुमारे १० हजार कोटी रुपये. या चार घटकांची बेरीजच एकूण थकबाकीच्या ९२ टक्क्यांएवढी होते. या प्रत्येक घटकाचे विश्लेषण आवश्यक आहे.

पहिला घटक शेतीपंप. २००५-०६च्या सुमारास निवडणुकीपूर्वी शेतीपंपासाठी वीज मोफत केली गेली. वर्षभराने हा अव्यापारेषु कारभार थांबवून वीजदर ५० पैशांवर आणला गेला. परंतु महिन्या-दोन महिन्यात लक्षात आले की, वीजदर ५० पैसे अधिक दीड रुपया इंधन अधिभार आल्यामुळे हा दर दोन रुपये केला गेला. मग सरकारने इंधन अधिभारही देण्याचे कबूल करून तो पुन्हा ५० पैशांवर आणला. पुढे काही वर्षांनी इंधन अधिभार पुन्हा लागू केला. हे सगळे पाच-सहा वर्षे सुरू होते. पुढच्या टप्प्यात एक फतवा काढून तीन अश्वशक्ती मोटारी असणाऱ्यांना पाच अश्वशक्तीप्रमाणे, तर पाच अश्वशक्तीच्या मोटारींना साडेसात अश्वशक्तीप्रमाणे वाढीव बिलाची सुरूवात झाली. बहुतेक ठिकाणी मीटर नसल्याने प्रती अश्वशक्ती दोन हजार युनिट वीज वापरली जाते, असा पहिल्या टप्प्यात महावितरणाचा दावा होता. पुढे आयआयटीची एक समिती स्थापन झाली, परंतु त्यांचा अहवालच प्रसिद्धच झाला नाही. मग वीज आयोगाने स्वत:च एक समिती नेमली. त्यावेळेचा दावा चौदाशे युनिट प्रतिअश्वशक्ती वीज वापर असा होता. आयोगाच्या अहवालानुसार, हा आकडा एक हजार ९३ आहे, असे म्हटले गेले आहे. परंतु आयोगाने सढळपणे तो १ हजार १८१ युनिट प्रतिअश्वशक्ती प्रतिवर्ष असे मान्य केले. आता एका वाहिनीवरील ग्राहकांना अश्वशक्तीच्या प्रमाणात त्या वाहिनीवर दिली गेलेली वीज त्या प्रमाणात वाटली जाईल. या पद्धतीने असे दिसून येत आहे की,हा आकडा हजारच्याही खाली जात आहे. ही थकबाकी वर्ष-दोन वर्षे नव्हे, तर गेल्या १५-१६ वर्षांच्या धोरणाचा परिपाक आहे.

# भारताची भूमिका महत्त्वाची?

**युक्रेनप्रकरणी आता अमेरिकेची भूमिका बदलत चालल्याची चिन्हे आहेत. आर्थिक तडाख्यामुळे युरोपचाही या युद्धाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलताना दिसतो आहे.**



गेल्या काही दिवसांत आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा काही घटना – घडामोडी घडल्या आहेत, की त्यांचा वरवर पाहता एकमेकींशी काहीही संबंध दिसत नाही. पण त्यांचा आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो. युक्रेनमधील प्रदीर्घ युद्धासंदर्भात आता अमेरिकेने युक्रेनला रशियाशी बोलणी करण्याचा सल्ला दिला आहे. युक्रेनला या युद्धात शस्त्रांची खऱ्या अर्थाने मदत केली जात होती ती अमेरिकेकडून. परंतु लांबत चाललेल्या युद्धाला अमेरिकेत स्थानिक पातळीवर पूर्वी इतका पाठिंबा देण्याचा उत्साह राहिलेला दिसत नाही. त्याचे महत्त्वाचे कारण हे अमेरिकेतील निवडणुका. अमेरिकेत निवडणुका, त्याबाबत घेतलेल्या भूमिका, रिपब्लिकन पक्षाचा वाढता जोर, राष्ट्राध्यक्ष बायडेन यांचा कमी होत चाललेला पाठिंबा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अमेरिकन अर्थव्यवस्थेबाबतची वाढती काळजी या आणखी काही घडामोडी. आता अमेरिकेचा युरोपीय राजकारणात, विशेषत: युक्रेनमध्ये हस्तक्षेप करण्याचा उत्साह कमी होत चालला आहे. त्याला असलेली आणखी कारणे म्हणजे युरोपियन युनियनच्या राष्ट्रांची होत असलेली आर्थिक कोंडी, संपत नसलेले, लांबलेले युद्ध, वाढत चाललेल्या तेलाच्या किमती, औद्योगिक क्षेत्रातील मंदीचे वातावरण आणि वास्तववादाकडे बघण्यास तयार नसलेले युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष.

या बदलांबाबतची तिसरी घडामोड ही चीन आणि तैवान संदर्भात आहे. चीनने आक्रमण केल्यास त्याला सामोरे जाण्यास आपण तैवानला लष्करी मदत करू, अशा वल्गना गेले अनेक महिने करणारी अमेरिका आता तैवानबाबत फारसे बोलताना दिसत नाही. चीनमध्ये अध्यक्ष क्षी यांनी आपले स्थान आता पक्के केले आहे आणि अमेरिकन अध्यक्ष बायडेन चीनचा दौरा करीत आहेत. त्यात नवीन गुंतागुंत म्हणजे बायडेन यांनी मध्येच इराणमधील राजकीय परिस्थितीच्या बाबतीत केलेले वक्तव्य. इराणमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर करून तेथे लोकशाही प्रस्थापित करण्यात आपण मदत करू असे बायडेन म्हणाले. अमेरिकेचे लक्ष आता तैवानपासून दुसरीकडे गेल्याचे हे चिन्ह आहे.

या बदलांबाबतची चौथी घडामोड म्हणजे रशियाने खेरसन शहरातून घेतलेली माघार. युक्रेनच्या पूर्वेकडील प्रदेशात, यात लुहान्स, डोनेस्क, मारीपोल शहर, धापोरिझझिया, खेरसन (शहर वगळता) यावर रशियाचा ताबा आहे. या प्रदेशात सार्वमत घेऊन रशियाने त्या क्षेत्राला रशियात समाविष्ट करून घेतले आहे. खेरसन शहरातून माघार घेऊन कदाचित रशिया युक्रेनला काही संदेश देत असावा. बोलणी करायची झाली तर ते शहर युक्रेनमध्ये राहील आणि बाकी भाग रशियाच्या ताब्यात राहू शकतो. ही एक प्रकारची तडजोड होऊ शकते का?

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 2023 मध्ये राज्यात निवडणूका लागणार; भाजपामध्येच धुसपूस!

## सुषमा अंधारेंनी सांगितलं 'कामाला लागा!'

। मुंबई। महाईन्यूज ।

**"कामाला लागा! २०२३ मध्ये निवडणूका लागणार म्हणजे लागणार" असं म्हणत शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच विद्यमान सरकार कोसळेल असं भाकित केलं आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील या सरकारमध्ये सर्वात मोठा पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीमुळेच सरकार कोसळेल असंही अंधारे यांनी म्हटलं आहे. भाजपामध्येच सध्या फार धुसपूस असल्याने सरकार कोसळेल असा दावा अंधारेंनी केला आहे.**




कर्जतमध्ये 'शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे' गटाच्या प्रबोधन यात्रेदरम्यान अंधारे बोलत होत्या. अंधारे यांनी थेट विद्यमान सरकार कोसळणार असल्याचं आपल्या भाषणात म्हटलं. या मागील कारण काय असेल याबद्दल सांगताना त्यांनी भारतीय जनता पार्टीमधील अनेकजण शिंदे गटाला दिल्या जात असलेल्या महत्वामुळे अस्वस्थ असल्याचा दावा केला. "हे सरकार पडणार असं मी म्हटलं की काही लोक विचारतात ताई कशावरुन म्हणताय? तर मी काही भविष्य सांगणारी नाही पण माझ्याकडे ठोस कारणं आहेत. मी अभ्यास करुन बोलते, हवेत बोलत नाही. अडचण अशी आहे की भारतीय जनता पार्टीमध्येच प्रचंड धुसफूस सुरु आहे," असं अंधारे म्हणाल्या.

शिंदे गटाबरोबर सत्तेत असताना भाजपाचं आपल्याच नेते आणि कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा दावा करताना अंधारे यांनी, "मी जसं म्हटलं तसं बाहेरच्या लेकरांना आंगडं-टोपडं, त्यांचेच वाढदीवस साजरे होत आहेत. घरची लेकरं उपाशी राहिलेली आहेत. बाहेरचीला बनारसी आणि घरची उपाशी अशी त्यांची (भाजपावाल्यांची) अवस्था झालेली आहे," असं म्हणाल्या.

---

## शॉर्ट न्यूज

### किल्ले प्रतापगड शिवभक्त व पर्यटकांसाठी आजपासून खुला



। बुलढाणा । महाईन्यूज ।

किल्ले प्रतापगड शिवभक्त व पर्यटकांसाठी आज पासून खुला करण्यात आला. अफजल खान कबरी वरील अतिक्रमण हटवण्याची मोहिम आठवड्या पासून सुरू होती. याकाळात किल्ले प्रतापगड पर्यटकांसाठी बंद करण्यात आला होता.आठ दिवसांच्या प्रतीक्षेनंतर स्थानिकांच्या मागणीनुसार प्रतापगडावरील पर्यटन सर्वांसाठी खुले करण्यात आले. अफजल खान कबरी वरील अतिक्रमण हटवण्याची मोहिम अचानक मागील आठवड्यात सुरू करण्यात आली.यासाठी दोन हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यासाठी परिसरात जमावबंदी आदेश जारी करण्यात आला होता. यामुळे परिसरतील हालचालींवर मर्यादा आल्या होत्या.स्थानिक व पर्यटकांनाही प्रवेश बंदी होती.

---

# एसटी अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी महागाई भत्त्याच्या दरवाढीस मुख्यमंत्र्याकडून हिरवा कंदील!

।कराड। महाईन्यूज ।

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या दरात वाढ करण्यास मुख्यमंत्री शिंदे यांनी मान्यता दिली आहे. महामंडळाचे सुमारे ९२ हजार अधिकारी-कर्मचारी असून त्यांना पूर्वी मिळणारा २८ टक्के महागाई भत्ता आता ३४ टक्के दराने मिळणार आहे. सुमारे १५ कोटी रुपयांची मासिक वाढ वेतनखर्चात होणार आहे. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या सन २०१६-१७ ते २०२१-२२ या सहा वर्षांसाठीच्या वेतनसुधारणेच्या प्रस्तावास देखील यावेळी मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाची ३०२ वी बैठक आज सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन- नैनोटिया, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चेन्ने, कामगार आयुक्त सुरेश जाधव, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांचेसह एसटी महामंडळ, परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.



---

# "शेतकऱ्यांची कर्जमाफी नाही, मग उद्योगपतींचं हजारो कोटींचं कर्ज माफ कसं केलं?"

## काँग्रेस नेते व खासदार राहुल गांधी यांचा भाजपावर जोरदार हल्लाबोल

। नाशिक । महाईन्यूज ।

काँग्रेस नेते व खासदार राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेच्या शेगावमधील सभेत भाजपावर जोरदार हल्ला चढवला. "आज देशाच्या कानाकोपऱ्यात भाजपाने द्वेष, भीती, दहशत आणि हिंसेचा प्रसार केला आहे," असा गंभीर आरोप राहुल गांधींनी केला. तसेच द्वेषाने या देशाचा कधीच फायदा होणार नाही, असं मत व्यक्त केलं. ते शुक्रवारी (१८ नोव्हेंबर) शेगावमधील भारत जोडो यात्रेच्या सभेत बोलत होते. यावेळी काँग्रेसचे



प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते.

राहुल गांधी म्हणाले, "विरोधक विचारत आहेत की भारत जोडो यात्रेची गरज काय?



### "राज्यात मागील सहा महिन्यात अनेक शेतकऱ्यांची आत्महत्या"

"द्वेषाने या देशाचा कधीच फायदा होणार नाही. विरोधक विचारतील भीती कशाची? जर ते या रस्त्यांवर फिरले असते तर पाच मिनिटात त्यांना ही गोष्ट समजली असती. या राज्यात मागील सहा महिन्यात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. का केली? कोणत्याही शेतकऱ्याशी बोला, ते म्हणतील आम्हाला योग्य दर मिळत नाही. मी हे ऐकून कंटाळलो आहे," असं राहुल गांधींनी सांगितलं. राहुल गांधी पुढे म्हणाले, "मी दुसरा प्रश्न विचारतो, तर ते म्हणतात विम्याचे पैसे भरले, मात्र नुकसान झाल्यानंतर एक रुपयाही मिळाला नाही. यानंतर ते शेतकरी प्रश्न विचारतात की, शेतकरी आत्महत्या करतो कारण ५० हजार एक लाखाचं कर्ज असतं. त्यानंतर हजारो शेतकरी आत्महत्या करतात."

### "शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही, पण उद्योगपतींचं हजारो कोटींचं कर्ज माफ कसं?"

"शेतकऱ्यांचं कर्ज माफ केलं जात नाही, मात्र उद्योगपतींचं हजारो कोटी रुपयांचं कर्ज कसं माफ होतं?" असा सवाल राहुल गांधींनी विचारला.

आज देशाच्या कानाकोपऱ्यात भाजपाने द्वेष, भीती, दहशत आणि हिंसेचा प्रसार केलाय. तुम्ही जिथं पाहाल तिथं तुम्हाला द्वेष, भीती आणि हिंसा दिसेल. याविरोधासाठीच भारत जोडो यात्रेची गरज आहे. या यात्रेचा उद्देश मन की बात करण्याचा नाही, तर जनतेचा आवाज ऐकण्याचा, त्यांचं दुःख समजून घेणं हा आहे."

# भाजपाने देशात भीती, द्वेष आणि हिंसा पसरवली!

## काँग्रेस नेते राहुल गांधींचा हल्लाबोल

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

देशाच्या कानाकोपऱ्यात आज भाजपाने द्वेष आणि हिंसा पसरवली आहे. आपण देशात कुठेही पाहिले तर आपल्या भीती, द्वेष आणि हिंसा पाहायला मिळेल. त्यामुळे भाजपाने पसरवलेल्या भिती, द्वेष आणि हिंसेच्या विरोधात आम्ही भारत जोडो यात्रा सुरू केली, अशा शब्दांत कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजपाविरोधात हल्लाबोल केला. राहुल गांधी यांच्या नेतृत्वातील भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात आहे. आज ही यात्रात शेगावमध्ये पोहोचली असून शेगाव येथे सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. विशेष म्हणजे राहुल गांधी यांनी या सभेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर भाष्य केले नाही.

शेगाव येथील आयोजित सभेत गजानन महाराज की जय असे म्हणत राहुल गांधी यांनी सभेला सुरूवात केली. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न मांडत भाजपावर हल्लाबोल केला. यावेळी ते म्हणाले की,

### भाजपाने द्वेष आणि हिंसा पसरवली

**“देशाच्या कानाकोपऱ्यात आज भाजपाने द्वेष आणि हिंसा पसरवली आहे. आपण देशात कुठेही पाहिले तर आपल्या भीती, द्वेष आणि हिंसा पाहायला मिळेल. त्यामुळे भाजपाने पसरवलेल्या भिती, द्वेष आणि हिंसेच्या विरोधात आम्ही भारत जोडो यात्रा सुरू केली. या यात्रेतून तुम्हाला काही सांगायचे आणि समजवायचे नाहीये, तर तुमच्या मागण्या समजून घेण्यासाठी ही यात्रा काढण्यात आली आहे. तुमच्यातील भिती ओळखण्यासाठी ही यात्रा आहे. भीती, द्वेष आणि हिंसेमुळे लोक तुटतता. पण प्रेमानी बोललो त्यांचे ऐकलं तर लोक जोडली जातात. गेल्या अनेक दिवसांपासून विरोधक सातत्याने या यात्रेवरून प्रश्न उपस्थित करत आहे. पण जर ते पाच मिनिटे तरी या यात्रेत चालली असती, तर त्यांना या यात्रेचा अर्थ कळला असता”, अशा शब्दांत राहुल गांधींनी भाजपावर टीका केली.**



“भारत जोडो यात्रा जवळपास 70 दिवसांपूर्वी कन्याकुमारी येथून सुरू झाली. भारताच्या शेवटच्या टोकापासून म्हणजेच समुद्र किनाऱ्यापासून भारत जोडो यात्रेला सुरूवात झाली. त्यानंतर दररोज २५ किलोमीटर ही यात्रा चालते. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, तेलंगणा, आंध्रा आणि महाराष्ट्र ही यात्रा सुरू आहे. ही यात्रा सुरू झाली तेव्हा विरोधकांनी या यात्रेची काय गरज असा सवाल उपस्थित केला होता. काय फायदो होणार ही यात्रा काढून असाही सवाल विचारला होता”

# दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशांना भुर्दंड लावण्याची गरज

## पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

दहशतवादाला एखाद्या देशाकडून मिळणारे खतपाणी म्हणजे राजकीय तसेच आर्थिक मदतीचा मुख्य स्रोत आहे. काही देश स्वत:च्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून दहशतवाद्यांना मदत करतात. अशा देशांकडून त्याचा भुर्दंड वसूल करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तान आणि चीनचा थेट उल्लेख न करता केले. दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा रोखण्यासंदर्भात नवी दिल्लीत आयोजित ‘नो मनी फॉर टेरर’ (एनएमएफटी) या तिसऱ्या मंत्रिस्तरीय परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. दहशतवादाच्या मुद्यावर कोणतीही संदिग्धता असू नये. दहशतवादाला मदत करणाऱ्या देशांवर भुर्दंड लावला पाहिजे. दहशतवाद्यांना सहानुभूती दाखवण्याचा प्रयत्न करणाऱ्या संघटना आणि व्यक्ती यांना एकटे पाडले



पाहिजे. या प्रकरणी कोणताही जर तर किंवा किंतु नसावा, असेही मोदी म्हणाले. जगाच्या आधी भारताने दहशतवादाचा क्रूर गडद चेहरा पाहिला आहे. गेली अनेक दशके दहशतवादाने विविध नावाने, स्वरुपात भारताचे नुकसान करण्याचा प्रयत्न केला. हजारो मौल्यवान जीव यात हकनाक गेले, मात्र भारताने तडफेने दहशतवादविरोधी लढा लढला आहे. दहशतवादाचे समूळ उच्चाटन होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार पंतप्रधानांनी व्यक्त केला.

दहशतवादाचा संपूर्ण मानवतेवरच परिणाम होत असतो. पण दीर्घकालीन प्रभाव प्रामुख्याने गरीबांवर आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर होतो.

# हैदराबादमधील कॉलेजच्या लॅबमध्ये गॅस गळती

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

तेलंगणाची राजधानी हैदराबाद येथील कस्तुरबा शासकीय महाविद्यालयातील प्रयोगशाळेत रासायनिक गॅसच्या गळती झाल्याची माहिती समोर येत आहे. या गॅसलच्या गळतीमुळे 25 विद्यार्थी बाधित झाले आहेत. ही घटना शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली.

गॅस गळतीमुळे विद्यार्थ्यांना मळमळ आणि चक्कर येत होती. त्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रयोगशाळेत कोणत्या गॅसची गळती झाली याची माहिती अद्याप अस्पष्ट आहे. आपत्ती व्यवस्थापनाचे पथक या गळतीचा शोध घेत आहेत.

यापूर्वी 14 ऑक्टोबर रोजी तामिळनाडूच्या होसूर जिल्ह्यातील कॉर्पोरेशन मिडल स्कूलच्या सुमारे 100 विद्यार्थ्यांच्या आवारात सेप्टिक टाकीतून गॅस गळती झाल्याचा संशय आला होता. त्यामुळे अनेक विद्यार्थी मध्यान्ह भोजनानंतर अचानक आजारी पडले. काही विद्यार्थ्यांना वर्गात उलट्या झाल्या होत्या. यावेळी एकूण 67 मुला-मुलींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच, प्रदूषण नियंत्रण मंडळ, होसूर महामंडळ आणि शालेय शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळेला



# युजर्सचा पर्सनल डेटा वापरणाऱ्या कंपन्यांना ठोठावला जाणार आता 500 कोटींपर्यंतचा दंड

## डेटाच्या माध्यमातून व्यक्तीच्या गोपनीयतेशी कोणत्याही प्रकारची तडजोड होत असेल तर सरकार कारवाई करेल.

।इराण । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन विधेयकाचा मसुदा आज केंद्र सरकारने प्रसिद्ध केला आहे. याअंतर्गत सरकार आता डेटा प्रोट्क्शन बोर्ड तयार करणार आहे. यात दंडाची रक्कम 500 कोटींपर्यंत वाढवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या नव्या विधेयकांतर्गत युजर्सचा पर्सनल डेटाचा गैरवापर केल्यास मोठा दंड आकारण्यात येणार आहे. सरकारने या मसुद्यात दंडाची रक्कमही वाढवली आहे. दंडाची रक्कम प्रभावित युजर्सच्या संख्येच्या आधारावर निश्चित केली जाईल. विधेयकात दिलेल्या नियमांनुसार कंपन्या दंडाविरुद्ध न्यायालयात दाद मागू शकतात.



कंपन्यांना सरकारी मान्यता असलेल्या देशांमध्ये डेटा ठेवावा लागेल. हा कायदा झाल्यानंतर कंपन्या चीनमध्ये डेटा ठेवू शकणार नाहीत.

विधेयकानुसार, एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक डेटाचे उल्लंघन करणे म्हणजे अनॉथराइज्ड डेटा प्रोसेसिंग करणे. एखाद्या व्यक्तीच्या पर्सनल डेटामध्ये छेडछाड किंवा नुकसान झाल्यास कारवाई देखील केली जाईल. याशिवाय डेटाच्या माध्यमातून व्यक्तीच्या गोपनीयतेशी कोणत्याही प्रकारची तडजोड होत असेल तर सरकार कारवाई करेल.

मसुदा प्रसिद्ध करून सरकार आता सर्व पक्षांची मते घेणार आहे. विधेयकाच्या मसुद्यावर 17 डिसेंबरपर्यंत मत पाठवता येईल. या विधेयकाचा मसुदा आयटी मंत्रालयाच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आला आहे. हा मसुदा संसदेच्या पुढील अधिवेशनात मांडला जाऊ शकतो. याद्वारे व्यक्तीच्या पर्सनल डेटाचे संरक्षण करणे, भारताबाहेर डेटा ट्रान्सफरवर लक्ष ठेवणे आणि कोणत्याही प्रकारच्या डेटा उल्लंघनासाठी दंडाची तरतूद करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. यापूर्वी सरकारने पर्सनल डेटा प्रोटक्शन विधेयक मागे घेतले होते. केंद्रीय आयटी मंत्री सप्टेंबरमध्ये म्हणाले होते की, सरकार येत्या काही दिवसांत डेटा प्रोटेक्शन विधेयकाचा नवीन मसुदा घेऊन येईल. युरोपियन युनियनच्या धर्तीवर डेटाच्या संरक्षणाबाबत सरकार हा नवा कायदा आणणार


## ‘फॅमिली मॅन’चा जोरदार दणका!




मध्यमवर्गीय, चौथी नापास आणि केबलचा व्यवसाय करणारी, कथा रचण्यात, ती प्रत्यक्षात आणण्यात निष्णात व्यक्ती पोलिसांची पळता भुई थोडी करू शकते याचा अनुभव आपण ‘दृश्यम’च्या पहिल्या भागात घेतला होता. या चित्रपटाचा दुसरा भाग ‘दृश्यम २’मध्ये नायक आपल्या कुटुंबाला वाचवण्यासाठी आणखी चाली खेळतो आणि त्याची ही कथा प्रेक्षकांना खिळवून, मंत्रमुग्ध करते. अभिषेक पाठक याचं नेमकं दिग्दर्शन, पटकथा, अभिनय या सर्वच आघाड्यांवर उजवा ठरलेला हा चित्रपट काही त्रुटी असूनही अविस्मरणीय अनुभव देण्यात यशस्वी ठरतो. ‘दृश्यम २’ची कथा गोव्यातच सुरू होते व मध्ये सात वर्षं उलटली आहेत. विजय साळगावकर (अजय देवगण) त्याच्या कुटुंबाच्या हातून झालेल्या खुनाच्या खटल्यातून सावरला आहे व त्यानं आपला केबलचा व्यवसाय वाढवला असून, एक सिनेमागृहाचा मालकही झाला आहे. त्याची पत्नी नंदिनी (श्रिया सरन), मुली अंजू (इशिता दत्ता) आणि अनू (मृणाल जाधव) मात्र त्या धक्क्यातून अद्याप सावरलेल्या नाहीत. मृत मुलाची आई मीरा देशमुखनं (तब्बू) खुन्यांना अद्याप माफ केलेलं नाही. पोलिसांनी केस फाइल केलेली असली, तरी या कुटुंबाभोवती एक जाळं विणून ठेवलं आहे. विजयच्या घराच्या आवारातून प्रेत गायब झालं होतं व ते त्यानं कुठं पुरून ठेवलं आहे हे पोलिसांना (प्रेक्षकांना माहिती होतं!) शोधून काढायचं होतं. त्यासाठी प्रत्यक्ष साक्षीदार शोधण्यासाठी पोलिस धडपडत असतानाच शहरात नवीन पोलिस महासंचालक तरुण अहलावत (अक्षय खन्ना) दाखल होतो आणि तो विजयची फाइल पुन्हा उघडतो. लक्ष्मीकांत गायतोंडे (कमलेश सावंत) हा निलंबित पोलिसही पुन्हा दाखल होतो आणि विजयच्या दिशेनं एक वादळ घोंघावत येतं. त्याचं कुटुंब पुन्हा एकदा या वादळाच्या भक्ष्यस्थानी सापडतं. यातून विजय कसा मार्ग काढतो, खुनाचं प्रकरण (पुन्हा एकदा) दडपण्यात तो यशस्वी होतो का, आपल्या कुटुंबाला वाचवण्यात त्याला यश येतं का याची उत्तर चित्रपटाचं थरारक, खिळवून ठेवणारा शेवट देतो.

# मृणाल कुलकर्णी यांच्या लेक व सूनेने सुरु केला नवा व्यवसाय

व्हिविराजस कुलकर्णी व शिवानी रांगोळेने एक नवा व्यवसाय सुरु केला आहे. अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांचा लेक विराजस कुलकर्णी व शिवानी रांगोळेचा विवाहसोहळा काही महिन्यांपूर्वी पार पडला. या दोघांचं एकमेकांवर असणारं प्रेम प्रत्येक व्हिडीओ तसेच त्यांच्या सोशल मीडिया पोस्टवरून दिसून येतं. शिवानी-विराजस कलाक्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. आता याव्यतिरिक्त दोघांनी एक नवी सुरुवात केली आहे. सतत काही ना काही नवं करण्याच्या शोधात असणाऱ्या या कपलने आता नवा व्यवसाय सुरु केला आहे. शि दोघांनी ‘विरानी’ नावाचा कपड्यांचा ब्रँड सुरु केला आहे. या ब्रँडची खासियत म्हणजे फक्त नाटक प्रेमींसाठी या ब्रँड अंतर्गत खास टी-शर्ट तयार करण्यात येणार आहेत. ‘रफु चक्कर’ या ब्रँडबरोबर त्यांनी हा व्यवसाय सुरु केला आहे. ‘रफु चक्कर’च्या वेबसाईटवर ‘विरानी’चे टी-शर्ट तुम्हालाही खरेदी करता येणार आहेत. वानी-विराजसने अभिनयक्षेत्रात उत्तम





काम करत प्रेक्षकांची मनं जिंकली. अभिनयाबरोबरच स्वतःचा व्यवसाय असावा म्हणून दोघांना एक भन्नाट कल्पना सुचली. शिवानी व विराजसने सोशल मीडियाद्वारे व्हिडीओ शेअर करत नवा व्यवसाय सुरु केला असल्याचं सांगितलं आहे. नाटकप्रेमींना लक्षात घेत शिवानी-विराजसने हा ब्रँड सुरु केला आहे. शिवाय या टी-शर्ट्सवर शांतता ठेवा नाटक सुरु आहे असे अनेक मॅसेज लिहिण्यात आले आहेत. शिवानी व विराजसच्या या नव्या व्यवसायाला त्यांचे चाहते तसेच सेलिब्रिटी मंडळी शुभेच्छा देत आहेत.

# हृतिक रोशनने चाहत्यांकडे केली मोठी मागणी

अभिनेता हृतिक रोशन हा नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतो. सध्या सगळ्यांनाच प्रतीक्षा आहे ती त्याच्या आगामी ‘फायटर’ या चित्रपटाची. या चित्रपटाची घोषणा गेल्या वर्षीच करण्यात आली होती, तेव्हापासूनच त्याचे चाहते या चित्रपटासाठी प्रचंड उत्सुक आहेत. नुकताच तो या चित्रपटाच्या शूटिंगसाठी आसामला रवाना झाला आहे. या वेळेचा त्याचा एक व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत असून तो चाहत्यांकडे एक मोठी मागणी करताना दिसत आहे. विशेष म्हणजे त्याची ही मागणी चाहत्यांनी एका क्षणात पूर्ण केली.



हृतिक रोशन चित्रपटाच्या शूटिंगसाठी आपल्या शहरात आला आहे कळताच त्याला पाहण्यासाठी चाहत्यांनी गर्दी केली. हृतिक रोशन ची एक झलक पाहण्यासाठी ते त्याच्या मागे मागे शूटिंग लोकेशनवर पोहोचले. चाहत्यांच्या इच्छेला मान देऊन हृतिकनेही चाहत्यांना आपली झलक दाखवली. यावेळी त्याचे चाहते त्याच्याशी संवाद साधण्यासाठी आणि त्याच्याबरोबर फोटो काढण्यासाठी त्याच्या मागे मागे येऊ लागले. चाहत्यांची गर्दी जमा होतेय असं पाहून हृतिक तिथून निघू लागला. तेव्हा त्याने चाहत्यांकडे एक महत्त्वाची मागणी केली. तो म्हणाला “मी चित्रपटाच्या शूटिंगला जात आहे, कृपया मला शुभेच्छा द्या.” ऋतिकची ही मागणी चाहत्यांनी हसत हसत स्वीकारली आणि त्याला ‘फायटर’ या त्याच्या आगामी चित्रपटासाठी शुभेच्छा

# “नशिबात असेल तर...” विशाखा सुभेदारच्या चाहत्याने व्यक्त केली अनोखी इच्छा

**अभिनेत्री विशाखा सुभेदार या कायमच विविध कारणांमुळे चर्चेत असतात. सध्या त्या त्यांच्या ‘कुर्रर्रर्र’ या नाटकामुळे चर्चेत आहेत. विशाखा सुभेदार यांनी मराठी मालिका आणि चित्रपटांमध्ये आपला ठसा उमटवला आहे. एक उत्तम कॉमेडियन म्हणून तिला ओळखले जाते. त्यांना कायमच विनोदी भूमिकांसाठी ओळखले जाते. त्यांचा चाहता वर्ग फार मोठा आहे. नुकतंच विशाखा सुभेदार यांच्या एका चाहत्याने त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यावर विशाखानेही भन्नाट उत्तर दिले आहे.**



विशाखा सुभेदार या नेहमीच इन्स्टाग्रामवर सक्रीय असतात. त्या कायमच विविध पोस्ट शेअर करताना दिसतात. विशाखा सुभेदार यांनी काही दिवसांपूर्वी इन्स्टाग्रामवर एक रिल शेअर केला आहे. या रिलमध्ये त्या एका गाण्यावर डान्स करताना दिसत आहेत. यावर अनेक जण कमेंट करताना दिसत आहेत. विशाखा सुभेदारने नुकतंच एका चाहत्याच्या कमेंटवर प्रतिक्रिया दिली आहे. विशाखा सुभेदारच्या जगदीश नावाच्या एका चाहत्याने कमेंट केली आहे. “मॅडम तुम्ही कॉमेडी खूप छान करता तुम्हाला भेटण्याचा योग कधी येईल सांगता येत नाही. नशिबामध्ये असेल तर तुम्हाला एक वेळेस भेटण्याची इच्छा आहे माझी”, असे त्याने म्हटले. त्यावर विशाखा सुभेदारने प्रतिक्रिया दिली आहे. “नाटक बघायला या...कुर्रर्रर्र हे नाव आहे नाटकाचं”, असे तिने म्हटले आहे.

विशाखा सुभेदारच्या या प्रतिक्रियेवर त्या चाहत्याने कमेंट केली आहे. “तुम्हाला या व्हिडीओबद्दल बोलत नाही. मी टीव्हीवरती तुम्हाला खूप पाहतो. मी तुमची कॉमेडीची टीम खूप मस्त आहे”, असे म्हटले आहे.

दरम्यान विशाखा सुभेदार यांनी ‘फु बाई फू’ आणि ‘कॉमेडीची बुलेट ट्रेन’ या कॉमेडी शोमधून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमातून ती घराघरात पोहोचली. विशाखा सुभेदार यांनी आतापर्यंत ‘फक्त लढ म्हणा’ (२०११), ‘४ इडियट्स’ (२०१२) आणि ‘अरे आवाज कोनाचा’ (२०१३) अशा काही चित्रपटांमध्ये काम केलं आहे. सध्या त्या कुर्रर्र या नाटकात काम करत आहे.

# अंध फुटबॉल वर्ल्डकपासाठी भारतीय संघ पात्र!

## माई बालभवनच्या मुलींचे वर्चस्व : उत्कृष्ट खेळाच्या जोरावर झाली निवड



**पुणे।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

केरळ येथे पार पडलेल्या अंधांच्या फुटबॉल सामन्यात जपानने भारतावर मात केली. मात्र, उत्कृष्ट खेळाच्या जोरावर पिंपरी-चिंचवड येथील माई बालभवन संस्थेच्या मुलींचे वर्चस्व असलेल्या भारतीय संघाने दिली कडवी झुंज दिली. त्यामुळे भारतीय संघ वर्ल्डकपसाठी पात्र ठरला आहे.

युनायटेड स्पोर्ट्स सेन्टर, कक्करनाड, कोची केरळ येथे दिनांक 11 ते 18 नोव्हेंबर IBSA ब्लाइंड फुटबॉल आशिया चॅम्पियनशीपचे आयोजन केले होते. आयोजक इंडिया आणि जपानची टीम यामध्ये दोन सामने झाले. दोन्ही सामन्यात जपानने भारताला मात दिली असली तरी उत्कृष्ट खेळाच्या जोरावर भारतीय संघ 2023 साली बर्लिंगम, इंग्लंड येथे होणाऱ्या महिला वर्ल्डकप साठी पात्र ठरला.

भारतीय संघाची कर्णधार दिपाली कांबळे हिच्या नेतृत्वात खेळताना सुरवातीस लय हरवलेल्या संघाने नंतर मात्र आत्मविश्वासाने उत्तम खेळ करत जपान संघाला कडवी झुंज दिली. कोमल गायकवाड, भाग्यश्री रूग्गी आणि दिपाली कांबळे यांना फेर प्ले अवॉर्ड मिळाला. जपानच्या किकी सुमारो स्वरा हिला बेस्ट प्लेयर ऑफ द टूर्नामेंट अवॉर्ड मिळाला. भारतीय संघाचे प्रशिक्षक सुनील म्यॅथु आणि गोल गाईड विक्रम सिंग यांनी संघाच्या कामगिरीवर आनंद व्यक्त केला.

### वर्ल्डकप साठी पात्र झालेला संघ पुढील प्रमाणे:

दिपाली कांबळे, कर्णधार (महाराष्ट्र), आशा मोतीराम (गुजरात), कोमल गायकवाड (महाराष्ट्र), मानसा (कर्नाटक), पद्मिनी तुदू (ओडिसा), शाहिस्ता (कर्नाटक), आर सी विजयालक्ष्मी (तामिळनाडू), यागम (कर्नाटक), भागुश्री रूग्गी (महाराष्ट्र), श्वेता (तामिळनाडू), निर्मला बेन (गुजरात), कांचन पटेल, गोलरक्षक, केरन, गोलरक्षक (तामिळनाडू).

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही